**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.०५)**

**सोमवार दिनांक ११ मे २०२६**

**ठळक बातम्या**

1. **परकीय चलन वाचवण्यासाठी विविध उपाय योजण्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह विविध मान्यवरांचं देशवासियांना आवाहन.**
2. **'विकसित भारत जी राम जी' कायद्याची अधिसूचना प्रसिद्ध, १ जुलैपासून अंमलबजावणी सुरू होणार.**
3. **भविष्यातील अर्थव्यवस्थेचे नेतृत्व करण्याची महाराष्ट्राची क्षमता -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस.**
4. **नागपूर विद्यापीठ परीक्षा आणि शासकीय पात्रता किंवा तत्सम प्रवेश परीक्षा एकाच दिवशी येत असल्यास अशा विद्यार्थ्यांची विद्यापीठाकडून विशेष परीक्षा घेतली जाणार.**

--------------------------------------

पंतप्रधान / मुख्यमंत्री आवाहन

पश्चिम आशियात सुरू असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशातल्या नागरिकांना परकीय चलन वाचवण्यासाठी ७ आवाहनं केली आहेत.

सर्वसामान्य नागरिकांनी खाद्य तेलाचा वापर कमी करावा, शेतकऱ्यांनी आयात केलेल्या रासायनिक खतांवरच अवलंबित्व कमी करावं असे आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे.

***(होल्ड बाईट - पंतप्रधान नरेंद्र मोदी ३० सेकंद)***

सार्वजनिक वाहतूक व्यवस्था आणि कारपूलिंगचा वापर करुन इंधनबचत करा आणि त्याद्वारे परकीय चलन वाचवा, असं प्रधानमंत्री काल हैदराबादमध्ये म्हणाले. वर्षभरासाठी परदेश दौरे थांबवा, सोने खरेदी करु नका असं आवाहनही त्यांनी भारतीयांना केलं आहे. वर्क फ्रॉम होम पुन्हा सुरू करण्याची सूचना त्यांनी विविध कंपन्यांना केली. २०४७ पर्यंत विकसित भारत बनवण्यासाठी आत्मनिर्भर होणं आणि सेंद्रीय शेतीवर भर देण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

इंधन आणि तेलाचा आवश्यकतेपेक्षा जास्त वापर केला तर भारतालाही संकटाचा सामना करावा लागू शकतो, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

*(होल्ड बाईट - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस १७ सेकंद)*

माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनीही व्यावसायिकांना तसंच नागरिकांना परकीय चलनाचा वापर कमी करण्य़ाचं आवाहन केलं आहे. परकीय चलनाचा अधिक वापर होत असलेली क्षेत्र पाहून हा वापर कसा कमी करता येईल यादिशेने प्रयत्न करण्याचं आवाहन वैष्णव यांनी केलं. सरकारच्या १२ वर्षातल्या अपयशामुळं अशा प्रकारचं आवाहन करावं लागतं आहे अशी टीका विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केली आहे. काय विकत घ्यावं काय घेऊ नये यासारख्या जबाबदारी नागरिकांवर टाकून सरकार जबाबदारी ढकलत असल्याचा आरोप त्यांनी केला. देशात सध्या ६९० अब्ज डॉलरच इतक्या मूल्याचं परकीय चलन उपलब्ध असल्याचं रिझर्व्ह बँकेनं शनिवारी प्रसिद्ध केलेल्या अहवालात स्पष्ट झालं आहे. गेल्या आठवडाभरात त्यात सुमारे पावणे ८ अब्ज डॉलरची घट झाली. गेल्यावर्षीच्या मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात देशातला परकीय चलनाचा साठा ६८६ अब्ज डॉलर इतका होता. पश्चिम आशियातलं युद्ध सुरू होण्यापूर्वी, २७ फेब्रुवारीला, देशातला परकीय चलन साठा ७२८ अब्ज डॉलरच्या विक्रमी पातळीवर पोहोचला होता. तेव्हापासून त्यात ३८ अब्ज डॉलरची घट झाल्याचं दिसतंय.

------------------------------------

सोमनाथ

गुजरातमधल्या सोमनाथ महादेव मंदिराच्या पुनर्निर्माणाला ७५ वर्षं पूर्ण झाल्याच्या निमित्ताने आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी पूजा केली. सोमनाथ मंदिराच्या कळसावर ११ तीर्थक्षेत्रांतल्या पाण्याने जलाभिषेक करण्यात आला. यानंतर झालेल्या ध्वजारोहण सोहळ्यातही प्रधानमंत्री मोदी यांनी सहभाग घेतला. पुनर्निर्मित सोमनाथ मंदिराच्या उद्घाटनाला ७५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने सोमनाथ अमृत पर्व साजरे केलं जात आहे. हे अमृत पर्व पुढची हजार वर्षं भारताला प्रेरणा देत राहील, असं मोदी यावेळी म्हणाले. नागपूर महानगरपालिकेतर्फे ‘सोमनाथ स्वाभिमान पर्व -अटूट आस्था की गौरव गाथा’ या धार्मिक-सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजनआज महाल इथल्या कल्याणेश्वर मंदिरात करण्यात आलं. कार्यक्रमात भक्तिगीत, ११ हजार ‘ॐ नमः शिवाय’ जप आणि रुद्राभिषेकाचे आयोजन करण्यात आलं

------------------------------------

जीरामजी

विकसित भारत रोजगार आणि आजिविका मिशन ग्रामीण कायदा २०२५ लागू करण्यासंदर्भात केंद्र सरकारनं आज अधिसूचना जारी केली. येत्या १ जुलै पासून

देशभरात हा कायदा लागू होणार आहे. या कायद्यानुसार ग्रामीण भागात प्रत्येक आर्थिक वर्षात किमान १२५ दिवस रोजगार मिळण्याची खात्री असेल.

-------------------------------------

कुमार आशीर्वाद

नागपूर जिल्ह्यात स्फोटके निर्मिती कंपन्यांमध्ये होणाऱ्या अपघाती घटनांना आळा घालण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या नेतृत्वात पेट्रोलियम एक्स्प्लॉजिव्ह सेफ्टी ऑर्गनायझेशन -पेसो त्याचप्रमाणे डायरेक्टरेट ऑफ इंडस्ट्रियल सिक्युरिटी अँड हेल्थ -डिश या संस्थांचे प्रतिनिधी , राष्ट्रीय अग्निशमन महाविद्यालयातील तज्ञ तसेच इतर तज्ञ यांच्या नेतृत्वात समिती स्थापन करण्यात येणार असून या समितीद्वारे अशा कंपन्यांची पाहणी नियमितपणे होणार असल्याची माहिती आज नागपूरचे जिल्हाधिकारी .कुमार आशीर्वाद यांनी दिली ते नागपूर प्रेस क्लब येथे 'मीट द प्रेस ' याप्रसंगी प्रसार माध्यमांना संबोधित करत होते .सध्या मतदार याद्यांच्या स्पेशल इन्वेस्टीगेशन रिविजन अर्थात सर याच्या प्रारंभिक कार्यवाहीचे उपक्रम सुरू असून सध्या सर हा कार्यक्रम निवडणूक आयोगाने महाराष्ट्र राज्यात घोषित केलेला नाही असे देखील त्यांनी स्पष्ट केलं.

-------------------------------------

बालभारती

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ अर्थात ‘बालभारती’तर्फे शैक्षणिक वर्ष 2026-27 पासून काही इयत्तांसाठी नव्या अभ्यासक्रमानुसार पाठ्यपुस्तके प्रकाशित करण्यात येणार आहेत. जून 2026 मध्ये इयत्ता दुसरी, तिसरी, चौथी आणि सहावीची नवीन पुस्तके उपलब्ध होणार असल्याने पालकांनी नव्या अभ्यासक्रमाचीच पुस्तके खरेदी करावीत, असे आवाहन ‘बालभारती’च्या संचालिका अनुराधा ओक यांनी केले आहे. यासंदर्भात ‘बालभारती’ने अधिकृत पत्रक प्रसिद्ध करून कोणती पुस्तके घ्यावीत आणि कोणती टाळावीत याबाबत स्पष्ट सूचना दिल्या आहेत.

-------------------------------------

आकाश फुंडकर

बुलढाणा जिल्ह्यातील  खामगाव मतदारसंघात राज्य शासनाच्या मातोश्री ग्रामसमृद्धी शेत/पाणंद योजना २०२५-२६ अंतर्गत ५५ गावांतील ८७ पाणंद रस्त्यांच्या कामांचे भूमिपूजन राज्याचे कामगार मंत्री आकाश फुंडकर यांच्या हस्ते शिरसगाव देशमुख इथं  करण्यात आले. या कामांसाठी १७ कोटी ४० लाख रुपयांचा निधी मंजूर

करण्यात आला असून १३० गावांना जोडणारे शेतरस्ते मजबूत होणार आहेत. पावसाळ्यापूर्वी ही कामे पूर्ण करण्याचा प्रयत्न असून त्यामुळे शेतकऱ्यांना शेतमाल बाजारपेठेत पोहोचविणे अधिक सोपे होणार असल्याची माहिती मंत्री आकाश फुंडकर यांनी दिली.

------------------------------------

फडणवीस CII

“पायाभूत सुविधा, नाविण्यपूर्णता, स्वच्छ ऊर्जा, तंत्रज्ञान आणि संस्थात्मक विश्वास या घटकांवर भविष्यातील आर्थिक नेतृत्व निश्चित होणार असून महाराष्ट्र त्यासाठी आवश्यक इकोसिस्टीम उभारत आहे,” अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. कॉन्फिडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री (CII) आयोजित ‘वार्षिक व्यवसाय शिखर परिषद 2026’ अंतर्गत झालेल्या ‘Vision For India @100’ परिसंवादात ते बोलत होते. महाराष्ट्र ६६० अब्ज डॉलर्सची अर्थव्यवस्था असून २०३० पर्यंत १ ट्रिलियन डॉलर्स अर्थव्यवस्था बनवण्याचे लक्ष्य असल्याचे त्यांनी सांगितले. मुंबई ट्रान्स हार्बर लिंक, समृद्धी महामार्ग, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, वाढवण बंदर आणि मेट्रो प्रकल्पांमुळे राज्याचा आर्थिक भूगोल बदलत असल्याचेही त्यांनी नमूद केले. महाराष्ट्र देशातील ६० टक्के डेटा सेंटर्सचे केंद्र असून ईव्ही, एआय, सेमीकंडक्टर्स आणि ग्लोबल कॅपॅबिलिटी सेंटर्समध्ये राज्य आघाडीवर असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. नागपूर देशाचे लॉजिस्टिक हब, तर गडचिरोली २०३२ पर्यंत भारतातील सर्वात मोठा ग्रीन स्टील उत्पादक जिल्हा बनेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. यावेळी CII चे महासंचालक चंद्रजीत बॅनर्जी उपस्थित होते.

------------------------------------

विशेष परीक्षा

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या उन्हाळी २०२६ परीक्षांना विविध केंद्रांवर सुरुवात झाली आहे. विद्यापीठ परीक्षा तसेच शासकीय पात्रता किंवा तत्सम प्रवेश परीक्षा एकाच दिवशी येत असल्यास अशा विद्यार्थ्यांची विद्यापीठाकडून विशेष परीक्षा घेतली जाणार आहे. विविध शासकीय पात्रता किंवा तत्सम प्रवेश परीक्षा आणि विद्यापीठाची परीक्षा एकाच दिवशी येत असल्यास अशा विद्यार्थ्यांनी त्यांच्या प्राचार्यमार्फत त्यांनी दिलेल्या परीक्षेचे प्रवेश पत्र आणि त्या संबंधित उपस्थितीबाबत दस्तावेज जोडून अर्ज संचालक, विद्यार्थी विकास विभाग यांच्याकडे जमा करण्यात यावे. या सर्व विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्याबाबत विद्यापीठामार्फत वेगळे परिपत्रक

निर्गमित करीत कळविले जाणार असल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळ प्रभारी संचालक डॉ. मोतीराम तडस यांनी दिली आहे.

-------------------------------------

महावितरण

केंद्र सरकारच्या 'पंतप्रधान सूर्यघर-मोफत वीज योजने'अंतर्गत महावितरणच्या नागपूर परिमंडळाने मोठी कामगिरी करत नागपूर आणि वर्धा जिल्ह्यातील १ लाख ७०८ घरांवर सौर ऊर्जा प्रकल्प उभारले आहेत. राज्यातील एकूण सौर प्रकल्पांपैकी नागपूर परिमंडळाचा वाटा १७.७२ टक्के असून एकूण स्थापित क्षमता ३८२.६ मेगावॅट आहे. नागपूर जिल्ह्यात ८२ हजार ६०१, तर वर्धा जिल्ह्यात १८ हजार १०७ ग्राहकांनी या योजनेचा लाभ घेतला आहे.

-------------------------------------

राज्यव्यापी आंदोलन

राज्यातील अकृषी विद्यापीठे आणि संलग्न महाविद्यालयांतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी प्रलंबित मागण्यांसाठी १४ मेपासून राज्यव्यापी आंदोलनाचा इशारा दिला आहे. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात झालेल्या द्वारसभेत संयुक्त कृती समितीने हा निर्णय जाहीर केला. सातवा वेतन आयोगाची संपूर्ण अंमलबजावणी, जुनी पेन्शन योजना लागू करणे, रिक्त पदभरती आणि पदोन्नतीतील बदल यांसह विविध मागण्या करण्यात आल्या आहेत.

-------------------------------------